जिल्हास्तरावर परवानाधारक भूमापक / भूमापन अभिकरण यांची मोजणीकामी नियुक्ती करण्यास मान्यता देण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: राभूअ-२०२१/प्र.क्र.०२ /भूमापन**

पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२
दिनांक : २५ मार्च २०२६

वाचा :-

१. शासन अधिसूचना क्र.राभूअ-२०२१/प्र.क्र.०२/भूमापन (ल-१), दि.२३.०७.२००४.

२. शासन अधिसूचना क्र.राभूअ-२०२१/प्र.क्र.०२/भूमापन (ल-१),दि.१०.१०.२०२५.

प्रस्तावना -

उपरोक्त संदर्भाधीन अनुक्रमांक १ येथील शासन अधिसूचना दि. २३/०७/२००४ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल (महसूल भूमापन व भूमापन क्रमांकाचे उपविभाग) नियम, १९६९ मध्ये सुधारणा करून पोटहिस्सा मोजणीचे कार्य खाजगी स्तरावर परवानाधारक भूमापकांकडून करून घेण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र जमीन महसूल (सीमा व सिमाचिन्ह) नियम, १९६९ मधील नियम १३ मध्ये सुधारणा करून हद्द कायम मोजणीसाठी देखील परवानाधारक भूमापकांची नियुक्ती करण्याचा निर्णय शासनाने संदर्भ क्र. २ मधील अधिसूचनेद्वारे घेतलेला आहे. मोजणी प्रकरणांचा जलद, पारदर्शक व गुणवत्तापूर्ण निर्गती होण्यासाठी परवानाधारक भूमापक यांची अभिकरणामार्फत जिल्हास्तरावर निविदा प्रक्रियेद्वारे निवड करण्याची बाब निश्चित होती. याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णयः-**

भूमि अभिलेख विभागामार्फत मोजणीचे काम करण्यात येते. मोजणीच्या वाढत्या अर्जांमुळे आणि मर्यादित शासकीय मनुष्यबळामुळे जमीन मोजणीची प्रकरणे प्रलंबित राहू नयेत, याकरीता जिल्हास्तरावर निविदा प्रक्रियेद्वारे परवानाधारक भूमापक यांची अभिकरणामार्फत निवड करण्यासाठी व एकूणच संनियंत्रण करण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | समितीमधील पद |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | वरिष्ठ तांत्रीक सल्लागार, एन.आय.सी. | सदस्य |
| ३ | प्राचार्य, औदयोगीक प्रशिक्षण संस्था, | सदस्य |
| ४ | जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख | सदस्य सचिव |

२. परवानाधारक भूमापक यांची अभिकरणामार्फत निवड करताना त्यांची तांत्रिक पात्रता, अनुभव व वयोमर्यादा, मानधन, प्रशिक्षण व परवाना, प्रशासकीय नियंत्रण, मोजणी प्रकरणांचे निकष याबाबी खालीलप्रमाणे निश्चित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) **तांत्रिक पात्रता, अनुभव व वयोमर्यादा:-** उमेदवाराकडे खालीलपैकी कोणतीही पात्रता असणे आवश्यक आहे -

१) महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त ITI (Surveying) प्रमाणपत्र अभ्यासक्रम

२) महाराष्ट्र तांत्रिक शिक्षण मंडळाचा सिव्हिल इंजिनियरिंग डिप्लोमा

३) मान्यताप्राप्त विद्यापीठाची सिव्हिल इंजिनियरिंग पदवी

४) Geoinformatics / GIS / Remote Sensing मधील डिप्लोमा / पदवी

५) महाराष्ट्र शासन / Survey of India मध्ये किमान १० वर्षे सेवा केलेले निवृत्त / स्वेच्छा सेवानिवृत्ती दिलेले भूमापन कर्मचारी.

६) वयोमर्यादा : १८ ते ६५ वर्षे व शारीरिकदृष्ट्या सक्षम

२) **मानधन / दरसूची**

१) किमान वेतन अधिनियम व इतर लागू अधिनियमांचे पालन बंधनकारक राहील.

२) नियुक्त परवानाधारक भूमापकास प्रतिमहिना रु. ३५,०००/- मानधन देय राहील.

३) कार्यालय ते मोजणी ठिकाण प्रवास खर्च मानधनामध्ये समाविष्ट राहील.

३) **प्रशिक्षण व परवाना**

१) निवडलेल्या उमेदवारांना भूमिअभिलेख विभागामार्फत दोन आठवड्यांचे प्रशिक्षण अनिवार्य राहील.

२) प्रशिक्षण शुल्क प्रति उमेदवार प्रति दिवस रु. १०००/- राहील.

३) प्रशिक्षणानंतर परीक्षा घेऊन पात्र उमेदवारांना Land Record Training Academy, Chh. Sambhajinagar (LRTA) परवाना प्रदान करण्यात येईल.

४) **परवाना वैधता व नूतनीकरण**

१) परवाना २ वर्षांसाठी वैध राहील. समाधानकारक कामगिरीच्या आधारे २ वर्षाची वाढ देण्यात येईल.

२) कामगिरी निकषांपेक्षा कमी असल्यास अतिरिक्त प्रशिक्षण आवश्यक राहील.

३) परवाना कालावधी संपण्यापूर्वी १ महिना आधी नूतनीकरण करणे बंधनकारक राहील.

५) **परवाना रद्दीकरण**

१) सलग ४ महिने परवाना न वापरल्यास किंवा भ्रष्टाचार / गुन्हेगारी कारणास्तव परवाना रद्द करण्यात येईल.

२) भूमापकाने एजन्सी सोडल्यास अभिकरणाने ४८ तासांत पर्यायी व्यक्ती नियुक्त करणे आवश्यक राहील.

६) **परवानाधारक भूमापक आणि उपअधीक्षक भूमी अभिलेख यांनी करावयाची कार्यवाही:-**

१) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचे कार्यालयाने विकसित केलेल्या ई-मोजणी २.० (e-Mojani Ver २.०) आज्ञावलीवर परवानाधारक भूमापकांची उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयामार्फत नोंदणी करण्यात येईल.

२) उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयाकडून नियोजित वेळापत्रकासह मोजणी प्रकरणांचे परवानाधारक भूमापकास वाटप करण्यात येईल.

३) नियोजित वेळापत्रकानुसार उपअधीक्षक भूमी अभिलेख (Dy. SLR) यांच्यामार्फत नोटीस निर्गमित करण्यात येतील.

४) संबंधित जमिनीच्या गट/सर्वे क्रमांकाची डिजिटल माहिती उपअधीक्षक भूमी अभिलेख यांनी परवानाधारक भूमापकास उपलब्ध करून देणे.

५) नियोजित दिवशी परवानाधारक भूमापकामार्फत प्रत्यक्ष जमिनीची मोजणी व हद्द कायम (Demarcation) करणे.

६) परवानाधारक भूमापक हा मोजणीची माहितीवर प्रक्रिया करून ती मूलभूत डिजिटल कॅडस्ट्रल नकाशावर (Base Digital Cadastral Map) सुपरइम्पोझ करेल.

७) परवानाधारक भूमापक हा जमिनीची मोजणी व हद्द कायम संबंधित सर्व कागदपत्रे ई-मोजणी २.० प्रणालीवर अपलोड करेल.

८) जर कामाशी संबंधित भौतिक कागदपत्रे उपलब्ध असतील तर परवानाधारक भूमापकाने ती जबाब पंचनाम्यासह उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयात सादर करणे.

९) परवानाधारक भूमापकाकडून ई-मोजणी २.० प्रणालीवर अंतिम नकाशा सादर (Final Submission) करणे.

१०) छाननी लिपिकामार्फत कागदपत्रांची छाननी कार्यवाही करण्यात येईल.

११) शिरस्तेदारामार्फत प्रकरणांची तांत्रिक तपासणी करण्यात येईल.

१२) तद्नंतर उपअधीक्षक भूमी अभिलेख यांच्यामार्फत अंतिम निर्णय/मंजुरी (Finalization) देण्यात येईल.

७) **मोजणी प्रकरणांचे निकष**

- दरमहा किमान २० मोजणी प्रकरणे पूर्ण करणे अनिवार्य राहील.

मोजणी प्रकरणांची गणना खालीलप्रमाणे राहील-

अ. १ मोजणी प्रकरण म्हणजे = ६ उपविभाग किंवा १० हेक्टर क्षेत्र

आ. १ भूसंपादन मोजणी प्रकरण म्हणजे = ३ सर्व्हे नंबर किंवा ८ उपविभाग

इ. १ बिगरशेती मोजणी प्रकरण म्हणजे = ८ भूखंड

**३.** जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य) यांनी जिल्हास्तरावर प्रसिध्द करावयाच्या निविदेचे प्रारुप सर्व जिल्हाधिकारी यांना उपलब्ध करुन देण्यात यावे. सदर निविदा जिल्हाधिकारी यांनी प्रसिध्द करुन परवानाधारक भूमापक यांची अभिकरणामार्फत निवड करावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३२५१४४६३३०७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=C8A7D6860FF227FD9E69A02E9CA5DFB2CCB25EDA92D749629970F349FC6ED260, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2026.03.25 14:47:27 +05'30'

**(संजय बनकर)**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण), यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. उपमुख्यमंत्री (नियोजन व वित्त), महाराष्ट्र शासन यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. मंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्यमंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा. लोकसभा/राज्यसभा सदस्य (सर्व), महाराष्ट्र राज्य,
८. मा. विधानसभा/विधान परिषद सदस्य (सर्व), महाराष्ट्र राज्य,
९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
१०.सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मुंबई,
११.जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२.सर्व विभागीय आयुक्त
१३. सर्व जिल्हाधिकारी.
१४.सर्व पोलीस अधिक्षक
१५.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१६.महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरिता)
१७.महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १ व २. मुंबई व नागपूर.
१८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २. मुंबई व नागपूर.
१९.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२०.सर्व उपसचिव/सर्व अवर सचिव व सर्व कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग
२१.निवडनस्ती (भूमापन)